# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २५.०५.२००४ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

मंगळवार दिनांक २५.०५.२००४ रोजी मा.महापौर सौ.रूख्मिणी राधाकिशन शिंदे यांचे अध्यक्षतेखाली (अर्थसंकल्पीय) महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.३० वाजता ''वंदेमातरम्'' या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त व संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
०२. स.स.श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसने
०३. स.स.श्री.राधाकृष्ण गायकवाड
०४. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
०५. स.स.श्री.वाणी ठकूजी रामसिंग
०६. स.स.श्री.तांबे गणेश रामचंद्र
०७. स.स.सौ.साजेदा बेगम विखार अहेमद
०८. स.स.श्री.औताडे रावसाहेब ममतू
०९. स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी
१०. स.स.श्री.रगडे भगवान दगडूजी
११. स.स.श्री.कावडे साहेबराव राणूबा
१२. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
१३. स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१४. स.स.श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ
१५. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१६. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोंखडे
१७. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१८. स.स.श्रीमती डॉ.आशा बिनवडे
१९. स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२०. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
२१. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
२२. स.स.सौ.सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२३. स.स.श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे
२४. स.स.श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
२५. स.स.श्री.नजर हमीद अ.गफुर
२६. स.स.श्री.शे.खाजा शे.शरफ़ोद्दीन
२७. स.स.सौ.कांबळे निर्मला विठ्ठल
२८. स.स.श्री.डॉ.भागवत किसनराव कराड
२९. स.स.श्री.आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३०. स.स.सौ.रशिदा बेगम गफ़्फ़ार यारखान

३१. स.स.श्री.मगरे सुनिल यादवराव
३२. स.स.शिंदे किशोर रावसाहेब
३३. स.स.श्री.अ.कादर अ.हफ़ीज
३४. स.स.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
३५. स.स.श्री.नासेरखॉन सरदारखॉन
३६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
३७. स.स.सौ.खरात कुसूमबाई दौलत
३८. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब
३९. स.स.सौ.मोरे जयश्री कुमारराव
४०. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४१. स.स.श्री.फुलारी नंदकुमार माधवराव
४२. स.स.सौ.कुलकर्णी जयश्री विजय
४३. स.स.श्री.पारे सोपान भाऊराव
४४. स.स.सौ.विमलताई भिकनसिंग राजपूत
४५. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४६. स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजूरकर
४७. स.स.सौ.संगिता बाळू मैंद
४८. स.स.श्री.रणधीरसिंग होलिये
४९. स.स.श्री.नासीरखान अ.रहेमान खान कुरैशी
५०. स.स.श्रीमती शाहीन जफ़र महेमुद ज़फर
५१. स.स.श्री.जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५२. स.स.सौ.चंद्रभागाबाई दाणे
५३. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
५४. स.स.श्री.स.सलिम स.युसूफ़
५५. स.स.श्री.तकीहसन खान कासीमहसन खान
५६. स.स.श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद
५७. स.स.सौ.सिद्दीकी नईम सुलताना म.फ़सियोद्दीन
५८. स.स.श्री.अजिजखान गणीखान
५९. स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
६०. श्री.शे.मुनाफ़ शे.यासीन
६१. स.स.श्री.सलिम पटेल समशेर पटेल
६२. स.स.श्री.कै सर खान बद्रोद्दीन खान
६३. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
६४. स.स.सौ.बबिता सुभाष कागडा
६५. स.स.श्री.स.अली सलामी स.मीरा सलामी
६६. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
६७. स.स.सौ.निखत परविन एजाज अली

**संवाद :**

श्री.राधाकृष्ण गायकवाड : सामाजिक कार्यकर्ते स्व.एस.टी.प्रधान यांचे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांना सभागृहातर्फ़े श्रध्दाजंली अर्पण करण्यांत यावी.

श्री.भागवत कराड : यास माझे अनुमोदन आहे.

श्री.मीर हिदायत अली

मा.महापौर : ठिक आहे. श्रध्दाजंली साठी सर्वांनी उभे राहावे.

याचवेळी स्व.एस.टी.प्रधान यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दाजंली अर्पण करण्यांत आली.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : विषय क्र.१ घेण्यांत यावा, नंतर चर्चेसाठी वेळ देण्यांत यावा.

श्री.मीर हिदायत अली : देशाचे पंतप्रधान पदी मा.डॉ.मनमोहनसिंह यांची नियुक्ती झाली, त्यांचे या सभागृहातर्फे अभिनंदन करण्यांत यावे.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर : अभिनंदन करण्यांत येते.

**विषय क्र. ३१२/१:**

दिनांक ११.२.२००४, रोजीची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक २०.२.२००४, १.३.२००४, ३१.३.२००४ व दिनांक ०३.५.२००४ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.महापौर : इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

श्री.नासेरखान सरदार खान : सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पातील नमुद केलेली कामे झालेली नाही. व या वर्षाच्या अर्थसंकल्पातही ती कामे आलेली नाही.

श्री.भगवान रगडे : विषय प्रकरणाबाबत चर्चा व्हावी. सर्व वृत्तपत्रात आले. अहवाल मागवावा.

मा.महापौर : विषय पत्रिकेवर निर्णय घेतल्यानंतर चर्चेसाठी वेळ दिला जाईल. विषय क्र.१ मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

दिनांक ११.२.२००४, रोजीची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक २०.२.२००४, १.३.२००४, ३१.३.२००४ व दिनांक ०३.५.२००४ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

**विषय क्र. ३१३/२:**

उपआयुक्त (प्र) यांनी प्रस्ताव सादर केली की, महाराष्ट्र शासनाने शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी व्यक्ती विकास केंद्र, मुंबई या संस्थेतर्फे अधिकारी,कर्मचारी यांच्यातील कार्यक्षमता वाढावी, शारिरीक,मानसिक तणावमुक्ती संदर्भात सुदर्शन क्रिया (Art of living) बाबतचे प्रशिक्षण देण्यात येते. यासाठी प्रती कर्मचारी रू.१५००/- खर्च येतो. त्यातील रू.१२००/- शासन अनुदान व रू.३००/- इच्छुक कर्मचाऱ्याकडून शुल्क आकारण्यात येते. साधारणत: बावीस तासांचे हे प्रशिक्षण असून शासनाने वरील प्रशिक्षण महानगरपालिकेतील कर्मचारी/अधिकाऱ्यांना द्यावे अशी सूचना केली आहे.

त्यासाठी महापालिकेतर्फे रू.१२००/- अनुदान प्रती अधिकारी,कर्मचारी व रू.३००/- संबंधीत कर्मचाऱ्यांचा सहभाग या तत्वावर आपल्या महानगरपालिकेतील कायम इच्छुक कर्मचारी/अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे योग्य राहील. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

सौ.निखत परविन : प्रत्येक विषयावर चर्चा करूनच निर्णय घेण्यात यावा. विषय क्र.२ बाबत प्रशासनाने खुलासा करावा.

मा.महापौर : नगर सचिव यांनी विषय क्र.२ वाचून दाखवावा.

नगर सचिव : (विषय क्र.२ वाचून दाखवितात.)

सौ.निखत परविन : कोणत्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण देणार आहे, खुलासा करण्यात यावा.

नगर सचिव : कायम स्वरूपी कर्मचाऱ्यांसाठी ही योजना आहे.

मा.महापौर : सहाय्यक आयुक्त -१ यांनी खुलासा करावा.

सहाय्यक आयुक्त-१ : हा प्रस्ताव शासन पत्राच्या आधारे प्रस्तावित केलेला आहे. या प्रशिक्षणासाठी जे स्थायी कर्मचारी आहे, त्यांचेसाठीच हा प्रस्ताव असून रू.१५००/- प्रत्येक कर्मचाऱ्यासाठी फिस आहे. ८०% रक्कम म्हणजेच रू.१२००/- शासनामार्फत रू.३००/- शुल्क प्रशिक्षणार्थी यांनी भरावे. प्रशिक्षणार्थींना चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण दिले जाईल. जे कायम स्वरूपी अधिकारी/ कर्मचारी आहेत त्यांचेसाठी ही योजना आहे.

मा.महापौर : विषय क्र.२ सर्वानुमते मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महानगरपालिकेतील कायमस्वरूपी सेवेत असलेल्या इच्छुक अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणेसाठी महानगरपालिकेतर्फे रू.१२००/- अनुदान देणे, प्रशिक्षणार्थी यांचेकडून रू.३००/- आकारणी करून प्रशिक्षण देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१४/ ३:**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद सुधारीत मंजुर विकास योजना आरक्षण क्रमांक २२ ‘‘बगीचा‘‘ या आरक्षणाने न.भू.क्र.१०६४९ क्षेत्र ३४५.३ चौ.मी.संपूर्ण बाधित होते. उक्त मिळकतधारकाने सदर बाधित क्षेत्र संपादन करणेसाठी ॲड चिंतकोटी यांचे मार्फ़त महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी सुचना शासनास दिनांक १२.०९.२००३ रोजी बजावलेली आहे. शासनाने सदरील खरेदी सुचना त्याचे पत्र जा.क्र./टिपीएस ३००३/१३२९/प्र.क्र.२८१/२००३ नवि-३० दिनांक ११ मार्च २००४ अन्वये कायम केलेली आहे.

उपरोक्त आरक्षणाखाली सुधारीत मंजूर विकास योजना अहवालानुसार सुमारे ०.२५ हेक्टर जमिन आहे. अर्जदाराचे केवळ ३४५.३० चौ.मी.क्षेत्र संपादन करून उद्देश सफ़ल होणार नाही. करीता संपूर्ण आरक्षणाखालील क्षेत्र ०.२५ हेक्टर जमिन संपादन करणे उचित होईल. विकास योजनेचा भाग नकाशा बोर्डावर चिकटविण्यात आलेला आहे.

अर्जदाराचे वरील खरेदी सुचना शासनाने दिनांक ११ मार्च २००४ रोजी कायम केली असल्याने सदरील प्रस्ताव खरेदी सुचना कायम केल्यापासुन एक वर्षाच्या आत म्हणजे दिनांक १० मार्च २००५ पूर्वी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. नसता आरक्षण व्यपगत

होते. करीता उक्त संपूर्ण आरक्षणाची भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे जा.क्र./मनपा/नरवि/भूसं/१०३१/२००४ दिनांक १५.०४.२००४ अन्वये पाठविण्यात आला आहे.

उपरोक्त आरक्षणाचे क्षेत्र सुधारीत मंजूर विकास योजनेनुसार सुमारे ०.२५ हेक्टर दर्शविणे असून भूसंपादनासाठी अंदाजे १२५.६६ लाख खर्च अपेक्षित दर्शविला आहे.

सबब उक्त भूसंपादनाचे पुढील कार्यवाही होणेसाठी व भूसंपादनास लागणाऱ्या खर्चासह भूसंपादन प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.प्रशांत देसरडा : टी.डी.आर.च्या संदर्भात महानगरपालिका प्रशासन कार्यवाही करणार आहेत की, नाही. का. प्रस्ताव टी.डी.आर.मध्ये का आणला नाही.

मा.महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री.जयवंत ओक : या शहरातील ज्या ज्या आरक्षीत जागा आहेत. प्रस्ताव समोर आला, त्यानुसार हा ऐरिया कोणता आहे. या आरक्षणाची आवश्यकता नाही का.तसेच आरक्षणाच्या जागेवर घरे आहेत की, नाही. महापालिकेच्या नकाशामध्ये त्या जागावर पार्कींगसाठी असेल,प्लेग्राऊंडसाठी असेल, स्पोर्टसाठी असेल. गुंठेवारी कायद्यानूसार अंमलबजावणी होत नाही. काही लोकांनी आरक्षीत जागेवर घरे बांधलेली आहे. एखाद्या जागेच्या संदर्भात तीन लोकांनी अर्ज दिले. बाकीच्या लोकांनी अर्ज दिले नाही. आरक्षण कोणतेही असेल त्या जागेवर घरे झालेली आहेत का. अशी शहरात महानगरपालिकेने किती आरक्षणे आहेत. भूखंडाचे अनेक प्रकरणे आहेत. एवढा इंट्रेस का या बाबतीत या जागेची गरज नाही का. गुंठेवारी कायदा लागू केल्यास महापालिकेला उत्पन्न मिळेल. तेथील नागरीकांना सध्या सोयी सुविधा दिल्या जात नाही. त्यांना बांधकाम करण्यास परवानगी दिली जात नाही. अशा लोकांची घरे नियमित करणार आहेत का? यावर महानगरपालिका का विचार करीत नाही. बिल्डरांना ताबडतोब परवानगी मिळते. आरक्षीत जमिनीपासून महापालिकेस उत्पन्नाचा सोर्स मिळू शकेल. ठराव पास केलेला आहे. गुंठेवारी कायद्याची अंमलबजावणी करावी. तेथील घरांना सोयी सुविधा याव्यात. १०० ठिकाणच्या वस्त्यात सुविधा मिळाल्या १४ झोपडपट्ट्यात मुलभूत गरजा दिल्या जात नाही. सभागृहाने जो निर्णय घेतलेला आहे तो मान्य करावा. आरक्षित जमिनीवर घरे झालेली आहे ती जागा डिलीट करणार काय ? एकीकडे कामे करायची नाही. कायदा दाखवायचा. याबाबत सविस्तर खुलासा करण्यात यावा. टी.डी.आर. या सभागृहाने मंजूर केलेला आहे. या नुसार प्रस्ताव का समोर येत नाही.

सहा.संचालक (न.र.) : विषय क्र.३ हा सुधारीत मंजूर विकास योजनेमधील आरक्षण क्र.२२/४ ज्याचा सि.स.क्र.१०६४९ आरक्षण क्षेत्र २५ आर आहेत. त्यापैकी ३४५.३ चौ.मी.साठी सि.स.क्र.१०६४९ या मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना १९६६ चे कलम ४९ अन्वये दि.१२ सप्टेंबर २००३ रोजी संबंधिताने खरेदी सुचना दिलेली असून ११ मार्च २००४ रोजी शासनाने

कायम केलेली आहे. शासनाने कायम केलेल्या तारखेपासून एक वर्षाच्या आत भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचे कडे पाठविणे आवश्यक आहे. सदरील प्रस्ताव दि.१५.४.२००४ रोजी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे. त्यामुळे हा प्रस्ताव मंजुर होणे आवश्यक आहे. यावर अपेक्षित खर्च १२५.६६ लक्ष आहे. मध्यंतरी टी.डी.आर. चा प्रस्ताव बऱ्याच वेळा सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आलेला होता. परंतु सदरील प्रस्ताव सभागृहात पारीत न झाल्यामुळे शासनाने १९.२.२००४ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे ३७ (१) अ नुसार शासनाने अधिसुचना काढलेली आहे. टी.डी.आर. संदर्भात संपूर्ण कार्यवाही करण्यासाठी मा.उपसंचालक नगररचना औरंगाबाद यांना कलम १६२ (अे) खाली नियुक्त अधिकारी म्हणून त्यांची नियुक्ती केलेली आहे. प्रस्ताव जो सादर झालेला आहे. तो भाग शहाबाजार येथील आहे.

महापौर : मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त : हा विषय थोडा वेगळा असल्यामुळे माहिती देणे गरजेचे वाटते. सभागृहात टी.डी.आर. चा विषय जरी आज सभागृहात नसला तरी टी.डी.आर. बद्दल प्रश्न स.सदस्य ओक यांनी विचारलेला आहे. सभागृहाच्या माहिती साठी सांगतो की,टी.डी.आर. अद्याप मंजूर केलेले नसून प्रशासनाने २-३ वेळा प्रस्ताव ठेऊनही ठराव मंजूर केलेला नाही. प्रशासनातर्फे त्या वेळीच मत स्पष्ट केलेले होते. ४-५ वर्ष उलट उशीर होतो आहे म्हणून शासनाने स्वत:हून अधिकार वापरून उपसंचालक नगररचना औरंगाबाद यांचे मार्फत टी.डी.आर.संदर्भात अंतिम निर्णय घेण्याचे काम चालू आहे. शासन स्वत: मंजूर करेल.

श्री.जयवंत ओक : टी.डी.आर. प्रस्ताव मंजूर झालेला आहे असे माझे मत आहे. प्रस्तावानुसार जागा भूसंपादन केली नाही तर आरक्षणातून जाणार. टी.डी.आर मंजूर नसेल तर प्रशासन यापुढे काय कार्यवाही करणार आहे. तसेच सभागृहात जे पत्रकार बांधव बसलेले आहे त्यांना बसण्यास त्रास होतो आहे. थंडगार हवा नाही,त्या ठिकाणी ए.सी.ची व्यवस्था नाही,पंखा लावलेला नाही. गैरसोय होऊ नये. पुढील बैठकीपासून दखल घ्यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे : या प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधीत जे मूळ मालक यांनी आरक्षणा बाबत शासनाकडे अर्ज सादर केलेला होता. त्यानुसार या आरक्षणाच्या बाबतीत शासनाने निश्चित काही पत्र व्यवहार केलेला आहेत का ? जर पत्र व्यवहार केलेला असेल तर प्रशासनाने नगर विकास विभागास काय माहिती पाठविलेली आहे. ज्यावेळेस आरक्षण उठविण्या संदर्भात शासनाने निर्णय घेतला. प्रशासनाने काय माहिती पुरविली होती खुलासा करावा.

सहा.संचालक (न.र.) : शासनाकडे जी माहिती देण्यात आली त्यात उक्त आरक्षणातील जागा बाधीत मिळकती या जुन्या वसाहतीतील मधील आहे. आरक्षणातील परीसर हा संपूर्ण

विकसीत असून गावठाण परीसर आहे. उद्यान आवश्यक आहे. अर्जदाराची खरेदी सुचना कायम करण्यास या कार्यालयाची हरकत नाही. असा अभिप्राय आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : पैसे देण्याचा प्रश्न येतो तेव्हा सभागृहासमोर प्रस्ताव येतो. आरक्षण उठवायचे की नाही यासाठी सभागृहाची मंजूरी घेण्याची आवश्यकता नव्हती का ?

सहा.संचालक (न.र.) : सदर आरक्षणातील बाधीत मिळकती ह्या जुन्या वसाहती मधील आहेत. त्या ठिकाणी उद्यान साठी जागा आवश्यक असून तसा अहवाल शासनाकडे देण्यात आलेला आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : गावठाण असले,जुन्या वसाहतीतील आरक्षण असले ते उठविण्यासाठी या सभागृहाच्या मान्यतेची गरज का भासली नाही. शासनाने जेव्हा माहिती विचारलेली होती त्यावेळीच या सभागृहाचे मत घेऊन शासनास कळविणे योग्य होते असे माझे मत आहे.

श्री.हिदायत अली : माझ्या वार्डातील आरक्षणाच्या संदर्भात प्रस्ताव आहे. ५००० चौ.मी.जागेवर जवळपास आरक्षण आहे. काही लोक ईमारत बांधकाम परवानगी मालमत्ता आरक्षण असल्यामुळे परवानगी देत नाही. पैसा नसेल तर रिकामे करावे. असेल तर मंजूर करावे.

श्री.काशिनाथ कोकाटे : प्रशासनाने या प्रस्तावातील जागेसंदर्भात शासनाला परस्पर माहिती दिली सभागृहाला काही कळविले नाही. पैसे देण्याची वेळ येते तेव्हा प्रस्ताव समोर येतो. सभागृहाचा अपमान होतो आहे. असे म्हटले तरी चालेल. होय किंवा नाही हा निर्णय घेण्यात यावा.

सहा.संचालक (न.र.) : सविस्तर खुलासा करण्यात येते. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २१ ते ३१ हे विकास योजना तयार करून शासन मंजुरीसाठी पाठवायचे आहे. ज्या भागाची विकास योजना किंवा सुधारित करावयाची असेल तर त्या बाबतचा इरादा आपण जाहीर करतो ते गॅजेट मधे येते. त्यानंतर कलम २४ नुसार नगररचना अधिकाऱ्याची नियुक्ती करतो. कलम २५ नुसार सर्वेक्षण करून विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करून कलम २६ (१) नुसार प्रारूप विकाय योजना तयार करून मा.सर्वसाधारण सभा त्यास मान्यता देते. त्यानंतरच प्रारूप विकास योजना प्रसिध्द केला जाते. कलम २८ अन्वये लोकांच्या सुचना व हरकती काय आहेत ते मागविली जातात व नियोजन समिती तयार करून कलम २९ खाली योग्य त्या दुरूस्त्या सुचवून व त्यानंतर शासनाकडे कलम ३० खाली प्रारूप विकास योजना मान्यतेसाठी पाठविण्यात येते. कोणत्या ठिकाणी आरक्षण ठेवायचे,कोणत्या ठिकाणी नाही ते त्याचवेळी सर्वसाधारण सभेतच मान्य केलेली असते.

श्री.काशिनाथ कोकाटे : या शहराचा विकास आराखडा तयार केला तेव्हा सुचना हरकती मागविण्यात आलेल्या आहे. गॅजेट मधे आलेले आहे. सभागृहाने त्या विकास आराखड्यात मान्यता दिलेली आहे. त्या कार्यवाहीनुसार हे आरक्षण उद्यानासाठी आहे. हे

आरक्षण हटविण्यात यावे किंवा मोबदला द्यावा. म्हणून संबंधीत जागेचे मालकाने शासनाकडे अर्ज देऊन मागणी केली. शासनाने दि.१२.९.२००३ च्या संबंधीताच्या पत्रानुसार दि.११ मार्च २००४ रोजी खरेदी सुचना कायम केली. संबंधीताने दि.१२.९.२००३ रोजी नगर विकास विभागात अर्ज दिला त्यानुसार शासनाने महापालिकेची भूमिका काय आहेत या बाबत विचारणा केलेली होती किंवा कसे हा माझा प्रश्न आहे.

सहा.संचालक (न.र.) : महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५२ नुसार मा.आयुक्त यांना जे अधिकार देण्यात आले त्यात ४९ चा समावेश आहे. विकास योजना मंजूर झाल्या नंतर जर १० वर्षाचा कालावधी झालेला नसेल व मिळकत धारक कलम ४९ नुसार खरेदी सुचना बजाऊ शकतात. व त्यांचे अहवालावर मा.आयुक्त अभिप्राय देतात.

श्री.जयवंत ओक : पुढील बैठकीस सविस्तर प्रस्ताव ठेवण्यात यावा. खुलासा बरोबर होत नाही. गुंठेवारी संदर्भात शासनाने जे डायरेक्शन दिले त्यांची अंमलबजावणी करणार की नाही. आरक्षणावर घरे झाली. त्या बाबत प्रशासन काय कार्यवाही करणार आहे.

मा.महापौर : सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येते व पुढील बैठकीत खुलाशासह ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे तुर्त हा प्रस्ताव स्थगित ठेवून पूढील बैठकीत सविस्तर माहितीसह ठेवण्यांत यावे. असे ठरविण्यात आले, त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

**संवाद :**

श्री.जयवंत ओक : महाराष्ट्रात कोणत्याही महानगरपालिकेचे असे मोठे सभागृह नाहीत असे माझे मत आहे. पत्रकारासाठी पंखा,ए.सी.ची व्यवस्था करण्यात यावी.

मा.महापौर : संबंधीत अधिकारी यांनी सुचनेची नोंद घ्यावी.

**विषय क्र. ३१५/४ :**

औरंगाबाद शहराचे मध्यवस्तीतून तसेच शहराच्या जुन्या भागातून वाहणाऱ्या प्रमुख नैसर्गिक पाणी प्रवाह/नाल्याच्या स्वच्छतेचा विशेषत: पावसाळा पूर्व व पासाळ्यातील सफ़ाई बाबतचा मुद्दा नेहमीच उपस्थित होऊन पासाळ्यातील ते एक कारण होते. प्रतिवर्षी ह्या बाबत सर्वस्तरावर चर्चा होते.

शहरातील नाले/नैसर्गिक पाणी प्रवाह हे लगतच्या वसाहतीतील नागरिकांनी/रहिवाश्यांनी टाकलेल्या/टाकत असलेल्या कचरा,रेती,माती मुळे साधारण १-१ मी. खोली पर्यंत भरलेले आहेत. परिणामत: नाल्याची खोली कमी होऊन नाल्याचे पाणी/प्रवाह तुंबत आहे. सदरील नाल्याचे प्रवाहातील कचरा काढून नाला प्रवाह सुरळीत करणे व पावसाळ्यात पावसाचे पाणी तुंबून समस्या निर्माण होऊ नये यास प्रथम प्राधान्य देऊन नाला सफ़ाईचा विचार होणे महत्वाचे ठरते.

आजमितीस शहरातील नाले पुर्णपणे मुळ खोली पर्यंत साफ़ करावयाचे झाल्यास मोठ्या स्वरूपात निधीची आवश्यकता आहे. तूर्तास तेवढे काम करणे निधी अभावी शक्य नसल्याने आता असे प्रस्तावित करण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे नाला प्रवाह सुरळीत करण्यास प्राधान्य देऊन

शहरातील नाल्याची पावसाळा पुर्व सफ़ाई करण्यासह पुढील एक वर्षाचे कालावधी करीता नाल्यातील कचरा हटवून नाले वर्षभर स्वच्छ/साफ़ राहतील, नाल्याचा प्रवाह सुरळीत राहील यासाठी निविदाचे माध्यमातून एजन्सी नियुक्त करण्यात यावी.

उपरोक्त कामाकरीता प्राथमिक अंदाजानुसार किमान रूपये ६०.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे. यामध्ये वर्षभर नाले सफ़ाई सह नाल्यातील कचरा गोळा करून तो नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथे Disposal करीता नेणे इत्यादीचा समावेश आहे.

करीता उपरोक्त कार्यवाहीस खर्चासह मान्यता व्हावी,प्रस्ताव मान्यतेनंतर या कार्यवाही बाबत निविदेच्या नेहमीच्या अटी/शर्तीसह वर्षभराच्या नाला सफ़ाई बाबत विशेष अटीची तरतूद करून निविदा माध्यमातून एजन्सी नियुक्तीची कार्यवाही करण्यांत येईल.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.जयवंत ओक : ६०.०० लक्ष नाला साफ़ सफ़ाई साठी खर्च करणार असून प्रशासनाने नियोजन कसे राहील खुलासा करण्यात यावा. गाळ काढण्याचे कसे नियोजन करणार.

सौ.निखत परवीन : नाल्यावर इमारती बांधलेल्या आहेत, जसे नाथ मार्केट, सुराणा बिल्डींग ई. आपण करारनामा केला आहे की, ज्यांनी इमारत बांधली त्यांनी साफसफाई करावी. मग ६० लाख आपणच का खर्च करायचे, त्यांचेकडून का घेण्यांत येत नाही. वर्षभर त्यांनीच साफ करावे.

श्री.आनंद तांदुळवाडीकर : नाल्यावर इमारत बांधकाम परवानगी दिली होती, याबाबत मागे चर्चा केली होती, त्यावेळी असे सांगण्यांत आले की, इमारत मालकाने त्या इमारती खालील नाल्याची जागा दरवर्षी स्वच्छ करणे आवश्यक आहे मागील वर्षात कोण कोणत्या इमारत मालकाने नाला साफ़ सफ़ाई केलेली नाही. त्यावेळी निर्णय घेतला होता. त्यांनी साफ़ केले नाही तर महानगरपालिकेने करावे. खर्च त्यांचेकडून वसूल करावे. प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. खुलासा करावा.

सौ.चंद्रभागाबाई दाणे : नाल्याची साफ़ सफ़ाई करण्याचे काम महानगरपालिकेचे आहे. परंतू काही ठिकाणी नाल्यात ड्रेनेज लाईन असतांना तेथे बांधकाम झाले. परवानगी देता येते का? परवानगी दिली नसेल तर झालेले बांधकाम काढण्यात यावे. ३० दिवसा पूर्वीच मी पत्र दिलेले आहे. त्याचे उत्तर घ्यावे नसता मी डायस समोर खाली बसेल.

मा.महापौर : संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता(ड्रे.) : स.सदस्या सौ.दाणे यांनी जो प्रश्न विचारला प्रश्नाचे उत्तर सहाय्यक संचालक नगर रचना विभाग देईल की, परवानगी दिली आहे का नाही. शहरातील सर्व नाले ६०.०० लक्ष रूपयाचे वार्षिक साफ़सफ़ाईचे काम एकाच ठेकेदारास द्यायचे म्हणून अगोदरच ठराव इतक्या लवकर या सभागृहासमोर आलेला आहे.

सौ.निखत जैदी : जे इमारती नाल्यावर बांधल्या त्यांचे सोबत त्यांनीच गाळ साफ़ करावे म्हणून करारनामा केलेला आहे. ६० लाख रकमेत याचा समावेश आहे का ?

कार्यकारी अभियंता(ड्रे) : ते काम सोडून घेतलेले आहे.६०.०० लक्ष रूपयात शहरातील महत्वाचे ११ नाले घेतलेले आहे. कोणाची लांबी ३ कि.मी.,४ कि.मी., १ १/२ कि.मी. अश्या प्रकारची लांबी आहे. त्याची रूंदी सरासरी ३ मी.घेतली ०.५ मी.विचारात घेतले. खोली ०.५ मीटर घेतली आहे या नाल्याची साफ़ सफ़ाई करण्यासाठी सुमारे ६०.०० लक्ष रूपये खर्च होणार आहे. पूर्ण गाळ निघणार नाही त्यासाठी या पेक्षा जास्त खर्च येणार आहे.

श्री.आनंद तांदुळवाडीकर : ज्या इमारत मालकांना त्यांचे इमारती खालील नाला साफ़सफ़ाई केली नाही त्यांचेकडून महानगरपालिकेने केलेला खर्च वसूल करण्याच्या सुचना दिल्या होत्या आता पर्यंत कोणत्या इमारत धारकाकडून वसूल केले खुलासा करावा. ६० लाखाचे नियोजन कसे करणार. तसेच त्यांच्या परवानग्या रद्द करा असा आपण निर्णय दिला होता.

श्री.अजिज खॉन : नाला साफसफाई बद्दल चर्चा चालू आहे. जे नाले बांधले ते तोडण्यात आले. त्या संबंधात मी व मा.सभापती श्री.नंदकुमार घोडेले, विरोधी पक्षनेते श्री.मिर हिदायत अली, सर्व मा.आयुक्ताकडे गेलो त्यानंतर सहा.संचालक नगर रचना व श्री.डी.पी.कुलकर्णी यांना जागेवर नेवूण तपासणी केली. त्याला १० ते ११ लाख खर्च करून नाला बनवला होता. नाला त्याच जागेवर पाहीजे तो तोडण्यात आलेला आहे. घरे वाहुन गेले होते. महापालिकेने प्रत्येक घराला २-२ हजार दिले व जिल्हाधिकारी यांनी देखिल मदत दिली. तोच नाला तोडण्यात आला. आता पाऊस आला तर पुन्हः घरे वाहुन जातील. त्याचाही खुलासा करण्यात यावा. न्यु.एस.टी. कॉलनीची १०-११ लाख खर्च करून नाला संरक्षित भिंत १९९७ ला बांधली होती व त्यास आता तोडण्यात आले. का तोडण्यात आले. घरे वाहून गेली होते.त्यावेळी श्री.भोगे आयुक्त असतांना महानगरपालिकेतर्फे प्रत्येक मिळकत धारकांना २-२ हजार व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ३-३ हजार मदत मिळाली. त्यावेळी खैरे साहेब पालकमंत्री होते. त्यांचे निधीचेही पैसे होते. नाला ९६-९७ मध्ये बांधला व आता तोडले. ते तोडण्याचे कारण काय. ज्यांची जागा होती, त्यांना मोबदला द्यावयास पाहीजे होते. उलट सुलट नकाशे तयार केले. तेथे १२ लाख खर्च करून बांधले. व ते पावसाळ्याच्या तोंडावरच तोडले. तेथे सर्व गरीब लोकांची घरे आहेत. मी, मा.आयुक्त, सहाय्यक संचालक नगररचना व श्री.डी.पी.कुलकर्णी यांना ही जागा नेवून दाखविली. तेथे १६० घरे आहेत. आपल्या महानगरपालिकेने मदत म्हणून नाला बांधुन दिला. ते का तोडण्यात आले. तोडण्याचे आदेश कोणी दिले. पाऊस आला तर १६० घरे वाहून जातील. यापूर्वी २ मूले वाहुन गेली आहे. व आताच तेथे एक बाई वारली. त्याच दिवशी सहाय्यक संचालक नगर रचना यांना घेवून गेलो होतो. त्यांचे समोरच लोक जमले होते. त्याला ही

३-४ महिन्यापासून टाळण्यात येत आहे. आज करू,उद्या करू सांगण्यात येते. पूर्वी जेथे संरक्षण भिंत होती ती तेथेच बांधण्यात यावी. तर गरीबांचे घरे राहतील, नाहीतर १०० ते १५० जिवित हाणी होण्याची शक्यता आहे. ताबडतोब काम सुरू करावे. तोडण्याचे आदेश कोणी दिले होते, त्याचाही खुलासा करावा.

श्रीमती पार्वतीबाई मानकापे: दोन वेळेस ५-५ लाख बजेट ठेवूनही अद्यापही संरक्षित भिंत झाली नाही. का झाले नाही. नाल्याची व्यवस्थीत साफ़सफ़ाई होत नाही. कचरा बाजूला केला जातो. गाळ काढला जात नाही. ४ फुट तरी काढायला पाहीजे. श्री.गायकवाड साहेबांनी पाहीले. माजी दोन्ही महापौरांनी पाहीले, अद्याप सोय झाली नाही. नाल्याच्या बाजूला अतिक्रमण होऊ नये. नाल्याच्या बाजूला संरक्षित भिंत असणे आवश्यक आहे. नाल्याला पुर आल्यास जिवण मरणाची भीती आहे. लक्ष दिले नाही.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : सभागृहात स.सदस्य एकत्रीत संभाषण करतात त्यामुळे कोणाचा काय प्रश्नआहे ऐकावयास येत नाही. एका-एक सदस्याच्या प्रश्नाचा खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता (ड्रे) : एस.टी.कॉलनी येथील संरक्षित भिंतीच्या संदर्भात २४ आणि २५ तारखेला भूमी अभिलेख विभागा मार्फ़त मोजणी करणार होते. त्यांनी तसे पत्र दिले आहे. काल आणि आज मोजमाप करणार होते. भू-मापन अधिकाऱ्यामार्फ़त मोजणी होईल. त्यानंतरच २ दिवसाने कार्यवाही करण्यात येणार आहे.

श्री.अजीज खॉन : आपण त्या ठिकाणी संरक्षणासाठी बांधली होती.ती का तोडण्यात आली. आपण १२-१३ लाख खर्च केले आहे ती संरक्षित भिंत का तोडण्यात आली अशी कोणती इमरजन्सी आली होती. पाणी जेथून शिरत होते, तेथेच बांधली होती.पहिल्यांदा बांधकामच का केलेले होते. खुलासा करावा. झालेल्या खर्चास जबाबदार कोण? कोणाच्या परवानगीने तोडले. आताच पावसाळ्याच्या सुरूवातीलाच का तोडले. सिडको,हडको,चंपाचौक,आझाद चौक येथून पाणी येते. जमीन खाजगी होती तर मोबदला देता आला असता.का तोडण्यात आले.

कार्यकारी अभियंता(ड्रे) : जी नाला संरक्षण भिंत बांधण्यात आली होती ती खाजगी जागेवर झालेली होती, असे नगर रचना विभागाने अभिप्राय दिला. ती डी.पी.रिझर्वेशन साईटवर होती. स्वेच्छा निधीतून काम करण्यात आले होते. खाजगी जागेवर ती कशी येते. त्याचा खुलासा सहाय्यक संचालक नगर रचना देतील. २४-२५ तारखेला भूमापन विभागाकडून मोजमाप केल्यानंतर त्यांनी दिलेल्या मोजमापाप्रमाणे ताबडतोब बांधकाम करण्याची कार्यवाही सुरू करू. ज्या नाल्यावर ज्या मालकांना इमारत बांधकाम केले त्या मालकाने त्या इमारती खाली नाला साफ़ सफ़ाई करण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सुचना झोन अधिकारी यांना देण्यात आलेल्या आहे. तसे पत्र सर्व झोन विभागात दिलेले आहे. वसूलीसाठी पाठविले पण वसूली झाली नाही.

श्री.अजीजखॉन : पावसाळ्यात घरे वाहून जातात. महानगरपालिका व कलेक्टर ऑफिस कडून मदत देण्यात येते आपण तोडता कसे. आपण पाहणी केली पूर्वीच्याच जागेवर नाला संरक्षण भिंत व्हावयास पाहीजे. त्याचे मोजमापही झाले नाही तरी तोडता कसे. मा.आयुक्तांनी सर्वसाधारण सभेत बोलले होते, मी कमेटी बसवेल व ज्यांनी चुकीचे काम केले त्यांचेवर कार्यवाही करू. यालाही ३-४ महिने झाले.

मा.आयुक्त : माझी व स.सदस्याची या संदर्भात दोन वेळेस चर्चा झालेली आहे. टेक्नीकल रिपोर्ट प्रमाणे केले आहे. पावसाळा येत आहे. या कामाच्या मागेच आहोत. नगररचना विभागाच्या रिपोर्ट नुसार भिंत पाडण्याची कार्यवाही झालेली होती. जे झाले ते खरे आहे. अभिलेखा प्रमाणे केले आहे. कोणी गैर जबाबदारीने केले तर त्यावर कार्यवाही होईल.

श्री.आनंद तांदुळवाडीकर : ज्या इमारत मालकाने नाल्यावर इमारत बांधकाम केले अटी शर्तीनुसार ज्यांनी नोटीस देऊनही नाला साफ़ सफ़ाई केलेला नसेल पैसे भरलेले नसेल त्यांचे इमारत परवानगी रद्द करणार का ? वेगळी आणखी काही कार्यवाही करणार आहे का?

कार्यकारी अभियंता (ड्रे) : कलम ८१ (३) खाली इमारत मालकांना नोटीसा दिलेल्या आहेत. त्यांनी साफ़ सफ़ाई करण्यात आलेल्या खर्चाचे पैसे भरणा केले नाही तर कार्यवाही करण्यात येईल. हा जो प्रस्ताव आहे,त्यासाठी ६० लाख प्रस्तावित केले आहे. ४५ ते ५० से.मी. खोल गाळ काढणेचे काम करण्यांत येईल. पूर्ण वर्षभर नाले साफ़ सफ़ाईचे काम एकाच एजन्सीजला देण्यात येतील वर्षभर एकच एजन्सी नाला साफसफाईला जबाबदार राहील. स.सदस्या श्रीमती मानकापे यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या बाबत नाल्याच्या बाजूला जागा उपलब्ध झाली नाही म्हणून संरक्षित भिंत बांधण्यात आलेली नाही.

श्रीमती पार्वतीबाई मानकापे: पावसाचे दिवस आलेले आहे. लोकांच्या घरात पाणी जाऊ शकते. वित्तहाणी,जिवित हाणी झाल्यास जबाबदार कोण ? गेल्यावर्षी आयुक्त साहेबांनी देखिल पाहणी केली आहे.

श्री.आनंद तांदुळवाडीकर : ०.५ मीटर खोली घेऊन नाल्यातील घाण काढणार आहे. त्याऐवजी पारदर्शकता ठेवण्यासाठी एक ट्रक भरल्यानंतर किती रक्कम द्यावयाची ते ठरवावे .त्यानुसार जेवढे मटेरियल ट्रीपा होतील तेवढी रक्कम अदा करावी लागेल. नाल्यांची खोली जास्त घ्यावी. या पध्दतीने चांगल्या प्रकारे साफ़ सफ़ाईचे काम होऊ शकते.

श्री.नासेरखॉन अ.रहेमानखान कुरैशी: या शहरात फ़क्त ११ नाले आहेत का ? उर्वरीत नाले साफ़सफ़ाई मध्ये का घेतले नाहीत. नुतन कॉलनी भागातील सर्व पाणी तसेच क्रांती चौक,शिवाजी महाराज पुतळयापासूनचे सर्व पाणी माझ्या वार्डात असलेल्या नाल्यात येऊन सावरकर चौकात जाते. त्या नाल्याचा समावेश का करण्यात आलेला नाही. या नाल्याचे आजपर्यत साफ़सफ़ाईच झालेली नाही. सिल्लेखाना येथील नाल्याचा समावेश नसेल तर तो करण्यांत यावा. जे जे नाले

समावेश केले ते नाले व तेथील परीसर सभागृहात वाचून दाखववा. सिल्लेखाना येथिल नाला घेतला आहे का.

कार्यकारी अभियंता (ड्रे.): ज्या ११ नाल्यांचा साफसफाई करण्याचा समावेश केलेला आहे. त्यात मेमन सोसायटी,जालनारोड, शहानुरवाडी, प्रतापनगर ३००० मी.लांबी आहे, भानुदासनगर दशमेशनगर प्रतापनगर एकनाथनगर ४००० मीटर लांबी आहे, न्यु.बालाजीनगर शिवशंकरकॉलनी ३०० मी., क्रांतीनगर सुयोगकॉलनी पदमपूरा १२०० मी., रचनाकार कॉलनी जालाननगर सादातनगर १००० मी., गणेश कॉलनी नागेश्वरवाडी सिध्दार्थ उद्यान ३००० मी., एम.जी.एम.हॉस्पीटल दलालवाडी समर्थनगर ३८५० मी., करीमकॉलनी एस.टी.कॉलनी ७०० मीटर, रहेमानिया कॉलनी ते एस.टी.कॉलनी ९०० मी., सिल्लेखाना ते वरद गणेश मंदिर ७०० मी.,टाऊन हॉल ते नुर कॉलनी ५०० मी. ई.११ नाल्यांचा समावेश आहे.

श्री.मीर हिदायत अली : ६० लाखांनी काम होत नाही. ११ नाल्यांचा समावेश केला. शहरात आणखी नाले आहेत, त्याची सुध्दा साफसफाई करणे आवश्यक आहे. सर्व नाल्यांचे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे.

कार्यकारी अभियंता (ड्रे.): ११ नाले साफसफाईसाठी घेतले आहे. ६० लक्ष खर्च होणार आहे. नाले साफसफाई साठी १० लक्ष तरतूद आहे. तरतूद वाढवून दिल्यास आणखी नाल्यांचा समावेश करता येईल.

श्री.मीर हिदायत अली : संपूर्ण शहरातील नाले किती आहे, सर्वे करावा त्यानंतर सविस्तर प्रस्ताव सभागृहासमोर आणण्यात यावा.

सौ.सिद्दीकी नईम सुलताना : पूर्ण औरंगाबाद शहर नाल्याने वेढलेले आहे. साफसफाई होत नाही. कारण काय ?

सौ.लिलावती घायतिलक : जालना रोडला लागून नाला आहे. संजयनगर भागाचा उल्लेख नाही. तेथील सफाई ०२ वर्षापूर्वी साफ केलेला होता व्यवस्थित साफ झालेला नाही.

सौ.सिद्दीकी नईम सुलताना : रोषणगेट ते सिमा दुध डेअरी गटार ते पण साफ नाही. नाल्याचेच काय पण दोन वर्षात अनेक पत्र दिले, त्या भागात देखिल सफाई होत नाही.

श्री.जयवंत ओक : सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात नाले साफसफाई वर ६०.०० लक्ष रूपये खर्च करणार आहे. माझ्या माहितीप्रमाणे शहरातील संपूर्ण नाल्यामध्ये गाळ साचलेला आहे. घाण साचलेली असून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी सुटलेली आहे. डासांची संख्या वाढलेली असून जनतेचे आरोग्य धोक्यात येवू शकते. नागरीक महापालिकेत लहान-लहान नाल्यातील साफसफाई करण्यासाठी (मशीन) यंत्र आहे. १८-२० लक्ष त्या यंत्राची किमंत आहे. ११०० कामगार कायम केले त्यांच्या पगाराचा खर्च वाढला. जेव्हढे ट्रिपा गाळ (मातीच्या ) होतील तेव्हढेच पैसे अदा करावे लागतील महापालिकेस जास्त खर्च सुध्दा येवू शकतो. नाशिक महानगरपालिका धरतीवर लहान नाले साफसफाई साठी यंत्र घेण्यात यावे.व त्या यंत्राने मटेरीयल वाहून नेण्यासाठी ०३ वाहने (ट्रक) खरेदी

करावे. तरच लहान मोठे साफ होवू शकतील. श्री.पंडागळे स्थायी समिती सभापती असतांना त्यांनी संपूर्ण नाल्याचा सर्व्हे करून सफाई करण्यासाठी हे मशीन घेण्यात यावे, असे आदेश दिले होते. त्याचे पालन झाले नाही. महापालिकेच्या इमारतीच्या जवळील नाला साफसफाई होत नाही. ठेकेदार ६०.०० लक्ष रूपये घेणार वरच्या वर कचरा गाळ (माती) काढणार ६० लक्ष रूपयात ३ मशीन (यंत्र) खरेदी केल्यास नाल्याची स्वच्छता तर होईलच परंतू ११०० कर्मचारी कायम केले, त्यांना शहरातील स्वच्छतेचे मजूर म्हणून काम करून घेता येईल. सकाळ / दुपार दोन पाळीत स्वच्छता करावी. चर्चेचे गांभीर्य लक्षात घेवून नाशिक महानगरपालिका धरतीवर नाले साफसफाई करण्यासाठी मशीन घेण्यात यावे. या महापालिकेने सुध्दा अशा नविन योजना राबविण्याचा प्रयत्न करावा. अशा सभागृहातर्फे मा.आयुक्त यांना सुचना आहे. शहर स्वच्छ करावे. आशिया खंडात नंबर दोनवर हे शहर आहे. १० मिनिटासाठी सभा तहकूब करावी. या इमारतीच्या बाजूलाच नाला आहे, तेथील परिस्थिती बघावी. किती प्रमाणात नाले स्वच्छ आहे. आपल्या लक्षात येईल. ६० लाख वाचतील. नाल्याच्या बाजूला घरे होतात. त्याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. जी ओरड या सभागृहात होते. प्रश्न उपस्थित होतात, ते होणार नाही.

कार्यकारी अभियंता (ड्रे) : या शहरात दाट वस्ती आहे. त्यामूळे लहान लहान नाल्यात ते मशीन (यंत्र) उतरू शकत नाही. गाळ काढल्यानंतर ट्रकमध्ये टाकू शकत नाही. म्हणून ते मशीन या शहरातील नाले साफसफाई साठी आणल्यास योजना सक्सेस होईल असे मला वाटत नाही. ते यंत्र या शहरात आणून ट्रायल घेतलेले आहे. नाल्यात उतरता येत नाही.

श्री.जयवंत ओक : मशिनरीचा उपयोग होत नाही. नाले साफसफाई करणार नाही. ११०० कर्मचारी सेवेत कायम केले, त्यांचा पगार दिला जातो. कामगारांच्या वतीने किती नाले साफ केले जातात. सभागृहाच्या निर्णयाला महत्व देत नाही. सभागृहाच्या वतीने माझी सुचना आहे की, नाशिक धरतीवर नाले साफ करण्याचे मशिन खरेदी केले तर संपूर्ण नाले साफसफाई होतील. सभागृहनेता, विरोधी पक्षनेता, सभापती या पदाधिकाऱ्यांना तसेच जेष्ठ दोन-तीन सदस्य यांना उद्याच नाशिकला पाठवून तेथील नाल्याची साफसफाई कशी होते, त्याची माहिती घेण्यास पाठवावे. बाजूच्या नाल्यात घाण साचलेली आहे. जी ओरड स.सभासद करतात ती योग्य आहे. महानगरपालिकेच्या हिताचा प्रश्न मी उपस्थित केलेला आहेत. गंभीर दखल घ्यावी. १० मिनिटासाठी सभा तहकूब करून बाजूच्या नाल्याची पाहणी केली तर परिस्थिती लक्षात येईल. नंतर पून्हा बैठक घेण्यांत यावी.

श्री.स.अली सलामी : सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पानुसार १० लक्षची तरतूद नाले साफसफाई साठी ठेवली एवढ्या कमी रक्कमेत संपूर्ण नाले साफ होणार नाही. मशिन खरेदी करण्या संदर्भात यापूर्वीही चर्चा झालेली होती. कार्यवाही केलेली

नाही. स.सदस्य श्री.भागवत कराड महापौर असतांना नाल्यावरील इमारतीचा सर्वे करण्यांत आलेला होता. त्या इमारत मालकांनी अटी शर्ती नूसार इमारती खालील नाले साफसफाई केलेले नाही. जसे औषधीभवन, पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक,श्रीमान श्रीमती दुकान मालक साफसफाई करीत नाही. प्रशासनाचे याकडे लक्ष नाही. रस्त्यावरील जागेवर बांधकाम केले. तेथे साफसफाई होत नाही. औषधीभवनची इमारत नाल्यावर आहे. रस्त्यातील जागेवर बांधकाम झाले आतापर्यंत काहीही कार्यवाही करण्यांत आलेली नाही. तसेच बॉम्बे मर्कन्टाईल बँक इमारत नाल्यावर बांधकाम आहे, त्यांचेवर काय कार्यवाही केलेली आहे. इमारतीखालील नाले महापालिकेने साफ केले, त्याचा खर्च का वसूल करण्यात आलेला नाही. सविस्तर असा खुलासा करावा.

श्री.सुनिल मगरे : स.सदस्य श्री.जयवंत ओक यांनी महत्वाचा मुद्दा मांडलेला आहे. या महापालिकेच्या अस्थापनेवर साफसफाई साठी २२३३ कामगार काम करीत असतांना सुध्दा नाले साफसफाई साठी दर वर्षी टेंडर काढले जाते. शिवाय २२ जणांचे असे वेगवेगळे विशेष पथक नियुक्त केलेले आहे. तरी सुध्दा टेंडर काढून नाले साफसफाई का करण्यांत येते. हा सुध्दा महत्वाचा प्रश्न आहे. ठेकेदारांना काम दिले तरी पूर्ण काम ते करीत नाही. असा प्रस्ताव होवू शकतो का? जे कर्मचारी साफसफाई साठी आहे ते ८ तास काम करतात का? जे २२३३ कर्मचारी साफसफाईचे काम करतात त्यांचेवर कोणत्याही अधिकाऱ्यांचे नियंत्रण नाही.त्यातील बरेचशे कर्मचारी कामच करीत नाही. ८ तासात दोन तीन तास काम करतात. जेवणासाठी व चहापानासाठी या कर्मचाऱ्यांचा जास्त वेळ जातो ८ तास काम करीत नाही. अधिकाऱ्यांचा वचक नाही. काम करून घेता येत नाही. कोणते कर्मचारी काम करतात, करीत नाही स्वत: मा.आयुक्त यांनी सकाळच्या सत्रात पाहणी करणे आवश्यक आहे. काही कर्मचारी हजेरी लावून घरी निघुन जातात. साफसफाईचे काम आहे. त्याच कर्मचाऱ्याकडून करून घेतले तर होवू शकते. अधिकाऱ्याच्या घरी ४-४ कर्मचारी कशासाठी देण्यांत येतात. या संदर्भात मागील बैठकीत मी चर्चा ही केलेली होती. कार्यवाही झालेली नाही. जे कर्मचारी कामे करीत नाही त्यांचेवर व जे जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे. अनेक भागात दररोज साफसफाई होत नाही. ११२४ कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केले, या कर्मचाऱ्यांना स्वच्छतेचे काम देण्यांत यावे. पावसाळ्याचे दिवस जवळ आलेले आहेत, आत्मपरिक्षणाची गरज आहे. नियमित नाले साफसफाई होणे गरजेचे आहे. नागरीकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. यात चांगल्याप्रकारे लक्ष घातले तर निश्चितपणे स्वच्छता होवू शकेल. आज काही भागात स्वच्छता व्यवस्थित होत नाही. याची गांभीर्याने दखल घ्यावी.

श्री.किशोर तुलशीबागवाले: बऱ्याच नाल्यावर अतिक्रमण झालेले आहे. पावसाळ्यात आजुबाजूच्या रहिवाशांना त्रास होतो. अतिक्रमण होणार नाही, याकडे प्रशासनाचे लक्ष असणे

आवश्यक आहे. जाफरगेट ते चुनाभट्टी पर्यंत नाल्यावर मोठे अतिक्रमण झालेले आहे. ते त्वरीत काढण्यांत यावे. आठवडी बाजाराच्या जागेतून पाण्याची पाईपलाईन जाते त्या पाईपलाईनला वेल्डींग करून लोकांनी अतिक्रमण केलेले आहेत. ते त्वरीत काढण्याचे आदेश करावेत. या संदर्भात मी पत्रही दिलेले होते. कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्वरीत अतिक्रमण काढावे.

श्री.भागवत कराड : नाले साफसफाई करण्यात यावी या विषयावर चर्चा होत आहे. प्रस्तावास उशीर झाला पावसाळ्यापूर्वी साफसफाई करण्यांत यावी. कार्यरत कर्मचाऱ्यांकडून साफसफाईचे कामे करून घेतल्यास आणखीनच मदत होईल नाल्यावर मोठमोठ्या इमारती झालेल्या आहे. त्या इमारत मालकाने स्वत:हून नाल्याची जागा साफसफाई करून घेणे आवश्यक आहे. अटी, शर्ती निश्चित केलेल्या आहेत. आजच्या आज नोटीसा देवून कार्यवाही करण्यांत यावी. पाऊस मोठ्या प्रमाणात पडला तर लोकांच्या घरात पाणी जाईल वित्त व जिवित हानी होवू शकते. तात्काळ निर्णय घेण्यांत यावा. जनतेचे आरोग्य धोक्यात येवू नये महत्वाचा विषय आहे. नाल्या साफसफाई करण्याबाबत तात्काळ निर्णय घेण्यांत यावा. आतापर्यंत ६० लाख रूपये खर्च कधीच झालेला नाही. वाढीव क्षेत्र सामील केले आहे का, खूलासा करावा. गांभीर्याने विचार करावा.

श्री.प्रकाश निकाळजे : ठराव हा पूढील वर्षासाठी साफसफाई होण्याचा आहे. २२३३ कर्मचारी मजूर म्हणून कार्यरत आहे. त्यांचेकडून काम करून घेण्यांत यावे. नाशिक महापालिकेच्या धरतीवर नाला सफाईसाठी मशिन (यंत्र ) खरेदी केले तर नाल्या साफसफाईसाठी आणखीनच मदत होईल. रू.६०/- लाख वाया न घालता चांगला विनियोग होईल. महापालिकेचे आर्थिक नुकसान होता कामा नये. नाला सफाईसाठी मशिन घेण्यात यावे, उद्याच्या उद्याच महापालिकेचे पदाधिकारी / अधिकारी व काही जेष्ठ सदस्य यांना नाशिक महापालिकेमध्ये माहिती घेण्यासाठी पाठविण्यात यावे. या शहरात अतिक्रमणामुळे नाले, नाल्या झालेल्या आहेत. भविष्यात मोठ्या स्वरूपात पाऊस झाल्यास मोठी वित्त व जिवित हानी होवू शकते. आपल्याकडील जे कामगार आहेत ते चांगले काम करतात त्यांचेकडून काम करून घेण्यात यावे.ठराव रद्द करावा. साफसफाईचे यंत्र सामुग्री मागवावे. व कर्मचाऱ्यांकडून नाले सफाईचे काम करून घ्यावे.

श्री.भागवत कराड : रू.६० लक्षचे टेंडर काढून खर्च करण्यापेक्षा नाले सफ़ाई मशिन खरेदी करावे. एक मशिनची किमंत १७ लक्ष आहे. दोन मशिन खरेदी करावे. हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा. नाशिक महापालिकेने मशिन घेतलेले आहे. पदाधिकारी नाशिक महापालिकेस भेट देतील माहिती घेतील त्या नंतर निर्णय घ्यावा. तसे निर्णय आपण घ्यावा. तेथे नाले कसे साफ होतात याची माहिती घ्यावी.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : दीड तासापासून या विषयावर चर्चा चालू आहे. १० लक्ष तरतूद आहे. दरवर्षी नाले साफसफाईसाठी टेंडर काढले जाते. खर्च दरवर्षी होतो, परंतू म्हणावी

तशी साफसफाई होत नाही. तीच परिस्थिती कायम राहते. स.सदस्य श्री.ओक,श्री.कराड,श्री.निकाळजे,श्री.मगरे यांनी जे मत मांडले ते योग्य आहे. हा प्रस्ताव रद्द करावा. नाशिक महानगरपालिकेच्या धरतीवर मशिन खरेदी करावे. त्या मशिनचा १२ महिनेही नाले साफसफाई साठी उपयोग होणार आहे. त्या मशिनची किमंत पाहता ४ मशिन येवू शकतात. पूढील बैठकीत प्रस्ताव ठेवून पदाधिकारी / अधिकारी यांना नाशिक महापालिकेस भेट देण्यासाठी मान्यता द्यावी. ते पदाधिकारी/अधिकारी नाशिक महापालिकेस जावून प्रत्यक्ष भेट घेवून साफसफाई कशी होते,माहिती घेतील. आज शहरात नाल्यामध्ये मोठ्या प्रमाणात घाण साचलेली आहे. दुर्गंधी पसरलेली आहे. जनतेचे आरोग्य धोक्यात येणार नाही, ही महापालिकेची जबाबदारी आहे. पूढील बैठकीत तसा मशिन खरेदीचा प्रस्ताव ठेवण्यांत यावा. एकूण ०४ यंत्र खरेदी करावे. हा प्रस्ताव रद्द करावा.

श्री.रतनकुमार पंडागळे : नाले साफसफाईचे यंत्र घेतल्यास साफसफाई होवू शकेल यात शंका नाही. नाल्याचे नाली झालेल्या असून, होणारे अतिक्रमण यास करणीभूत आहे. महापौर डॉ.भागवत कराड असतांना त्यांनी नाल्यावरील अतिक्रमणाचे सर्वे करण्याच्या सुचना दिल्या होत्या व अशी अतिक्रमण काढावी असे आदेशित केलेले होते. साफसफाई करण्याचे काम खाजगी व्यक्तीला देवून असे टेंडर पध्दतीने देण्यांत येणारे काम थांबविले पाहीजे.केंद्र शासनाचे नगर विकास खात्याच मंत्री महोदय यांनी या महापालिकेस भेट दिलेली होती. स्वच्छतेच्या बाबतीत त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये समाधान व्यक्त केलेले होते. या महापालिकेच्या सफाई कामगांरानी चांगले काम केल्या बध्दल बक्षीस मिळविलेले आहे. कर्मचारी काम करीत नाही. गैरहजर असतात असे विविध आरोप करणे बरोबर नाही. महापालिकेचे कर्मचारी हे या शहरातील नागरीकांचे आरोग्य चांगले ठेवण्यास त्यांचे मोठे सहकार्य आहे. खाजगीकरणाचे प्रयोग थांबवावे. भारतामध्ये या शहराची स्तुती झाली. सर्व श्रेय कर्मचाऱ्यांना जाते.

श्री.मीर हिदायत अली : दोन मशीन, एक वाहन (ट्रक) खरेदी करावे. किंवा दोन ट्रक (वाहने) खरेदी करावे. एकूण चार वाहने खरेदी करावे. एक मशीन बरोबर एक ट्रक (वाहन) मटेरीयल काढल्यानंतर घेवून जाण्यासाठी लागेल. जी जी पथके नियुक्त केलेली आहे. त्यांनी त्यांचे सफाईचे काम करावे.

मा.महापौर : या विषयावर पदाधिकारी/अधिकारी नाशिकला जावून पाहणी करून येतील त्यानंतर पुढच्या सभेमध्ये हा ठराव मशीन घेण्यासाठी ठेवण्यांत येईल.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी यांनी नाशिक महानगरपालिकेस भेट देवून तेथे यंत्राद्वारे (मशीन) गाळ कसे काढतात त्याबद्दल पाहणी करून मशीन घेण्याचा प्रस्ताव पूढील सभेत ठेवण्यांत यावा असे ठरले.त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

**संवाद :**

सौ.चंद्रभागाबाई दाणे : बसस्टँड जवळील नाल्यावर अनधिकृतपणे बांधकाम झालेले आहे. त्या संबंधीत मी वेळोवेळी पत्र दिले कार्यवाही करण्यात आलेली नाही.

श्री.सुनिल मगरे : स.सदस्या सौ.दाणे यांच्या प्रश्नाचा खुलासा करण्यात यावा. शहरातील जे नाले आहेत, त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे. प्रशासनातर्फे काय कार्यवाही करण्यात येत आहे. जे अतिक्रमण झालेले आहे, ते संबंधीत अधिकाऱ्यांच्या संगनमताने झालेले आहे. आपल्या कर्मचाऱ्यांचा हात आहे. सर्व नाल्यांचे सर्वेक्षण व्हावे. स.सदस्या सौ.दाणे यांनी पत्र देवूनही त्याची दखल घेण्यात आलेली नाही.

श्री.भागवत कराड : ज्या ज्या इमारतींना नाल्यावर बांधकाम परवानगी दिली त्या इमारत मालकांनी त्यांचे इमारतीखालील नाला साफ़सफ़ाई करण्याची जबाबदारी असतांना केलेले नाही. त्यांनी साफ़सफ़ाई करावी. प्रशासनाला सूचना द्याव्यात.

सहा.संचालक (न.र.) : ज्या इमारत मालकांना नाल्यावर इमारती बांधण्यास परवानगी दिलेली आहे, त्यांनी त्यांचे हद्दीतील नाला साफ़सफ़ाई केलेला नसेल त्यांची यादी काढून कार्यवाही केली जाईल व सविस्तर खुलासा पुढील बैठकीत दिला जाईल.

श्री.सुनिल मगरे : एक महिन्यापूर्वी स.सदस्या श्रीमती दाणे यांनी नाल्यावरील अतिक्रमण काढण्याबाबत निवेदन दिले. एक महिन्यात का कार्यवाही झालेली नाही. नाल्यावर अतिक्रमण कसे झाले. नाल्यावर अनेक इमारती झाल्या. हॉटेल्स झालेले आहे. ड्रेनेज नाल्यात सोडलेले आहे. निवेदन देवून एक महिना झाला.

श्री.किशोर तुलशीबागवाले : नाल्यावर अतिक्रमण झालेले आहे. ते काढण्याची कार्यवाही करण्यांत यावी. नाले होते अतिक्रमणामूळे नाल्या झालेल्या आहेत. अधिकारी लक्ष देत नाही.

श्रीमती पार्वती मानकापे : माझ्या वार्डात अधिकाऱ्यांनी चार-चार वेळेस सर्वे केला मी स्वत: नाल्यावरील अतिक्रमण दाखवून दिले. काढण्यात आले नाही. यापूर्वी महापौर पदावर असलेले श्री.जैन व श्री. कराड यांनी सुध्दा त्याभागात प्रत्यक्ष भेटी दिलेल्या होत्या पाहणी करूनही कार्यवाही केलेली नाही.

श्री.सुनिल मगरे : नाल्याच्या जागेवर अतिक्रमण केलेले आहे. स.सदस्या श्रीमती दाणेबाई यांनी ०१ महिन्यापूर्वी पत्र देवूनही कार्यवाही झालेली नाही.

मा.महापौर : प्रशासकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी : स.सदस्या श्रीमती दाणेबाई यांचा जो प्रश्न उपस्थित केला त्या संदर्भात पाहणी केली असता संबंधिताने बांधकाम परवानगी घेतलेली आहे. बांधकाम परवानगी व्यतिरिक्त बांधकाम झाले असेल तर तपासणी करून प्रशासकीय विभागामार्फ़त कार्यवाही करण्यांत येईल.

श्री.सुनिल मगरे : खूलासा योग्य नाही. परवानगी घेतली असेल. संबंधीताने नाल्यावर बांधकाम कसे केले.

प्रशासकीय अधिकारी : श्रीमती मानकापे पार्वती यांचे वार्डातील अनधिकृत रित्या झालेले बांधकाम पुढील आठवड्यात काढण्यात येईल. सर्वे झाला आहे. नोटीसा तामील केल्या आहेत. विष्णुनगर येथील अतिक्रमण २८ तारखेला पाडणार आहोत.

श्री.गाजी सादोद्यीन : महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण करून बांधकाम केल्यास त्यास जबाबदार कोण असते.

श्री.प्रशांत देसरडा : संबंधित एक जबाबदार अधिकारी यांची सभागृहात बोलण्याची पध्दत बरोबर नाही. सध्याचे जे प्रशासकीय अधिकारी हे नियमानुसार त्या पदावर कार्यरत आहेत का प्रशासनाने खुलासा करावा. नसतील तर प्रशासकीय अधिकारी यांची बदली करण्यात यावी. तांत्रिक व अतांत्रिक मुद्दा आहे. हे पद नॉन टेक्नीकल आहे. त्याप्रमाणे अधिकारी मागवावेत. तसेच सध्या कार्यरत असलेले प्र.प्रशासकीय अधिकारी यांचे कार्यकाळात झालेल्या अतिक्रमणाची चौकशी करावी. भानुदासनगर भागात एक अतिक्रमण न्यायालयाचे आदेश असतांना मा.उपआयुक्तांनी २ वेळा त्यांना सुचना केली असतांना काढण्यात आलेले नाही. माझेही पत्र दिलेले आहे. विभाग प्रमुख उपआयुक्ताचे सुचना खालचे अधिकारी पालन करीत नसतील तर प्रशासकीय अधिकारी याची आजच्या आज बदली करण्याचे आदेश करावेत.

श्री.नासेरखॉन अ. रहेमान खॉन कुरैशी : सिल्लेखाना येथील अतिक्रमणाच्या बाबतीत न्यायालयाचे आदेश काय आहेत : खुलासा करण्यात यावा. झालेले अतिक्रमण का काढण्यात आलेले नाही. का उशिर झालेला आहे.

श्रीमती शाहीन जफ़र : १९७१ ची परवानगी घेतलेली आहे. ३ वर्षांनी लॅप्स होते. ती लॅप्स झालेली आहे. नविन परवानगी नाही. अनेक वेळ प्रश्न विचारले असता योग्य उत्तर मिळालेले नाही. येत्या २७ तारखेपर्यंत सदरचे अतिक्रमण काढण्याबाबत कार्यवाही न झाल्यास महापालिका जबाबदार राहील. नोंद असावी. विधीसल्लागार यांना सर्व माहिती आहे.

श्री.भागवत कराड : न्यायालयाचे आदेश असतांना अधिकारी अतिक्रमण पाडण्याची कार्यवाही करीत नाही. कोण पाठीमागे आहे. विधी सल्लागार व उप आयुक्त यांनी खुलासा करावा.

याच वेळी मा.महापौर यांचे डायस समोर जाऊन स.सभासद मोठमोठ्याने बोलतात. काहीही ऐकावयास येत नाही.

श्री.तकी हसन खॉन : नाला साफ़ सफ़ाईची चर्चा होत आहे. विषयांतर होत आहे.

मा.महापौर : विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

विधी सल्लागार : या प्रकरणी खुलासा करण्यात येतो की, शे.नवाब शे.बशीर रा.सिल्लेखाना यांनी सी.टी.एस.न-१७८५० येथील अनधिकृत बांधकाम संबंधी मा.दिवाणी न्यायालयात दावा दाखल केलेला होता. त्यांनी १५ x १० चौ..फूट आकाराचे लाकडी बांधकाम केलेले आहे असे दिले परंतू प्रत्यक्षात ७० x ५० फूटाचे बांधकाम आहे. या बांधकामास पाडण्यास कलम ५२,५३ नुसार नोटीस दिली

आहे. बांधकाम पाडण्यास प्रतिबंध करावा म्हणून मनाई हुकुमाची बाजूने निकाल दिला पुन्हा संबंधीत व्यक्ती यांनी अतिरिक्त जिल्हा न्यायालयात अधिक मनाई हुकुम मिळावा म्हणून दाखल केला तो ही न्यायालयाने फ़ेटाळला त्यानंतर संबंधीत व्यक्तीने मा.उच्च न्यायालयास मनाई हुकूम मिळण्यासाठी विनंती केली. त्यानंतर अंतिम निर्णय होण्या अगोदर संबंधीताने दाखल केलेले मा.उच्च न्यायालयातील प्रकरण काढून घेतले यावरून उच्च न्यायालयाचे काही स्थगिती आदेश नाहीत. याचिका परत घेतली त्यांनी पुन्हा दिवानी न्यायालयात दावा दाखल केला.

श्री.नासेरखॉन अ. रहेमान खॉन कुरैशी : मा.उच्च न्यायालयातून संबंधीताने याचिका परत घेतल्यानंतर काय कार्यवाही : करण्यात आलेली नाही. खालच्या कोर्टाचा निकाल महापालिकेच्या बाजूने आहे. तेव्हाच का कार्यवाही करण्यात आली नाही.

विधी सल्लागार : संबंधीताने मा.उच्च न्यायालयात दिवाणी दावा दाखल केलेला होता. परत घेतलेला आहे. मा.उच्च न्यायालयाचे कोणतेही मनाई आदेश नाहीत.

श्री.प्रकाश निकाळजे :टी.डी.आर. चा प्रस्ताव मंजूर होऊनही कार्यवाही का झाली नाही. अविकसित भागात सुविधा नाही. काही नाल्यांवर घरे झालेली आहेत. काय कार्यवाही करणार. अंमलबजावणी केली असती तर हा प्रश्नच निर्माण झाला नसता. अनधिकृत वसाहती होत आहेत. तेथे टी.डी.आर. लागू केल्यास तिथले बांधकाम करणे नागरीकांना सोपे होईल.

श्री.काशिनाथ कोकाटे : न्यायालयाचा मनाई आदेश नाहीत. असे अधिकारी सांगतात याचा अर्थ सदरचे बांधकाम अनधिकृत झाले प्रशासकीय अधिकारी यांनी का कार्यवाही केलेली नाही. २४ तासाच्या आत बांधकाम पाडण्याचे आदेश द्यावेत. अधिकारी कार्यवाही करीत नसेल तर त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

मा.आयुक्त : यापूर्वीही स्थायी समितीत झालेल्या बैठकीत खुलासा केलेला आहे. या जागेवरील अतिक्रमणा संदर्भात स्थगिती आदेश नाहीत. ते अतिक्रमण झालेले आहे. सदस्याच्या भावना रास्त आहे. मनपाचे कर्मचारी अतिक्रमण काढण्यासाठी गेले होते,त्यांना मारहाण झाली,पोलीसांनी बघ्याची भूमिका घेतली. विशेष बंदोबस्ता मध्ये अतिक्रमण काढावे लागेल. त्यासाठी वेळ लागेल. सविस्तर माहिती स्थायी समितीच्या बैठकीत दिलेली आहे.गुन्हे दाखल करायचे ते केले. या संदर्भात जी जी कार्यवाही करावी लागणार आहे, प्रशासन ते करीत आहे.

श्री.नासीरखान अ.रहेमानखान : कोणतीही कार्यवाही केलेली नाही. (मोठमोठ्याने बोलतात.)

मा.आयुक्त : पोलीस आयुक्तांकडून पोलीस बंदोबस्त मागविण्यात येत आहे. जास्तीचा पोलीस बंदोबस्त लावण्यात येणार आहे. कार्यवाही करण्यांत येईल.

श्री.काशिनाथ कोकाटे : वारंवार एकच विषय सभागृहात येतो कार्यवाही होत नाही. या संदर्भात स.सदस्या श्रीमती शाहीन जफ़र व स.सदस्य श्री.नासीरखान कुरैशी यांनी वारंवार ०६ महिन्यापासून या संदर्भात प्रश्न उपस्थित केले. संबंधीत अधिकारी

या संदर्भात कार्यवाही करीत नसेल तर गंभीर बाब आहे. तेथील परिस्थिती काय होती त्याची माहिती सर्वांना आहे. जबाबदारीने सदस्य सूचना करतात. अतिक्रमण काढण्यासाठी पोलीस बंदोबस्त आवश्यक असेल तर तो मिळवावाच यासाठी प्रशासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. पोलीस यंत्रणा बघ्याची भुमिका घेवून कोणी व्यक्ती जीव धोक्यात टाकूण काम करण्याची वेळ येत आहे. वारंवार स.सदस्य सूचना करूनही अधिकारी अंमलबजावणी करीत नसेल तर योग्य नाही. सभागृहाने गंभीरतेने घ्यावे. या शहरात किती अतिक्रमणे झालेली आहेत. याचे गांभीर्य लक्षात घेणे आवश्यक आहे. मा.आयुक्तांनी यात स्वत: लक्ष घालून कार्यवाही करावी जेणे करून अनधिकृत बांधकामास आळा बसेल.

श्री.भागवत कराड : वारंवार या विषयावर सभागृहात चर्चा होते. तीन बैठकीत हा मुद्दा उपस्थित झाला. आताच मा.आयुक्त यांनी खुलासा केला. किती दिवसात कार्यवाही करणार, रिझनेबल वेळ किती. मा.न्यायालयाची मनाई नसेल तर ताबडतोब करावे.

श्रीमती पार्वती मानकापे : आताच खुलासा केला माझ्या वार्डातील अनधिकृत बांधकाम २८ तारखेला काढणार ०४ वर्षापासून अधिकाऱ्यांनी दिशाभूल केली. आतापर्यंत का काढले नाही. नाल्याची नाली झाली.

श्री.प्रकाश निकाळजे : अतिक्रमण काढण्यासाठी प्रशासनाचे कर्मचारी गेले होते. त्या ठिकाणी मारहाण करण्यात आली. महापालिके चे कर्मचारी जखमी झाले. पोलीसांनी बघ्याची भूमिका घेतली असेल तर मा.आयुक्त कार्यवाही करतील. याबाबत लवकरच कार्यवाही होईल आताच खुलासा केलेला आहे.कर्मचाऱ्यांचे त्या ठिकाणी मनोबल ढासळलेले आहे. यासंदर्भात मा.पोलीस आयुक्त यांची सर्व पदाधिकारी यांनी भेट घेवून जास्तीचे पोलीस पथक देण्याबाबत प्रस्ताव मांडला तर झालेले अनधिकृत बांधकाम काढले जाईल व यापूढेही अतिक्रमण न होण्यास सहकार्य मिळेल. श्रीमती मानकापे यांचे प्रभागातील अनधिकृत बांधकाम तेथे आपण काहीच सुख सूविधा देत नाही. आपणांस पाडता येत नाही कारण आपण काहीच सूविधा दिल्या नाही.

श्री.मिर हिदायत अली : सिध्दार्थ गार्डन समोर पत्रकारांसाठी पत्रकार भवन होण्यासाठी जागा देण्यात आलेली होती त्या जागेवर सध्या हॉटेल झालेली आहे, खुलासा करावा.

श्री.प्रकाश निकाळजे : एक इमारत काढून चालणार नाही. पूर्ण वसाहत पाडावी लागेल.

मा.महापौर : स.सदस्यांच्या भावना लक्षात घेवून न्यायालयाने जे आदेश दिले त्याप्रमाणे अतिक्रमण काढण्याची कार्यवाही व्हावी.

श्री.प्रशांत देसरडा : प्रशासकीय अधिकारी यांची बदली करण्यात यावी.

श्री.नासीरखान अ.रहेमान खान : कर्मचाऱ्यांना मारहाण झाली अद्याप का गुन्हा दाखल केलेला नाही. अतिक्रमण काढण्याबाबत कोणींीही कार्यवाही केलेली नाही.

मा.महापौर : अनधिकृत बांधकाम असेल तर प्रशासकीय अधिकारी यांनी ते अतिक्रमण काढण्याबाबत कार्यवाही करावी.

श्री.मिर हिदायत अली : सिध्दार्थ गार्डन समोर पत्रकारांसाठी पत्रकार भवन करण्यासाठी जागा देण्यात आलेली होती. जवळपास ८० किमंतीची जागा आहे. त्या जागेवर सध्या हॉटेल झालेले आहे.

श्रीमती पार्वती मानकापे : माझ्या प्रश्नाचाही खुलासा करावा.

श्री.भागवत कराड : सभागृहाच्या भावना लक्षात घेता प्रशासकीय अधिकारी यांची बदली करण्यात यावी.

श्री.प्रशांत देसरडा : नॉन टेक्नीकल अधिकारी या पदावर असावे.

श्री.प्रकाश निकाळजे : प्रशासकीय अधिकारी म्हणून श्री.कंकाळ यांची नियुक्ती केली व ते चांगले काम करतात म्हणून या सभागृहाने त्यांचे कौतूक केले होते.

श्री.प्रशांत देसरडा : नॉन टेक्नीकल अधिकारी या पदावर असावे.

मा.महापौर : प्रशासकीय अधिकारी मा.न्यायालयाच्या निर्णयावर कार्यवाही करत नाही. त्यांची बदली करण्यांत यावी.

श्री.प्रकाश निकाळजे : या सभागृहात एकमत करून निर्णय घ्यायचा आहे. सभागृहात एखाद्या अधिकाऱ्याचे खच्चीकरण होईल असे होवू नये. नागरीकांना सोयी सुविधा उपलब्ध करून द्यायच्या आहेत. वैयक्तीक कारणावरून अधिकाऱ्यांवर कार्यवाही होत असेल तर ते माझ्या मते बरोबर नाही. ही प्रशासकीय बाब आहे. मा.आयुक्त कार्यवाही करतील त्यांचेवर सोपवावे. विनंती की, या प्रकरणाची कार्यवाही करण्यासाठी जास्तीचे कर्मचारी देण्यात यावे, जर कूणी स्वत:चा प्राण धोक्यात घालून काम करीत असेल व त्यांचा विचार होत नसेल तर बरोबर नाही. परिस्थिती वेगळी आहे, आपण समजावून घ्यावी. व त्यानूसार आपण आदेश द्यावेत ही विनंती.

श्री.अ.कादर अ.हाफ़ीज : सिध्दार्थ उद्यान समोर पत्रकारांसाठी पत्रकार भवनासाठी जागा देण्यात आलेली होती. तेथे अतिक्रमण झालेले आहेत का, खुलासा द्यावा.

श्री.मीर हिदायत अली : पत्रकार भवनासाठी जागा दिली होती अतिक्रमण केले.

मा.महापौर : याबाबत संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

सहा.संचालक (न.र.) : संबंधीत प्रकरणाची संचिका काढून त्याची तपासणी करून लेखी स्वरूपात खुलासा केला जाईल.

**विषय क्र. ३१६/ ५:**

शिक्षणाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,औरंगाबाद महानगरपालिकेतील शाळांना पेय जल प्रकल्पाद्वारे ६६ शाळांना रोटरी क्लब औरंगाबाद व महानगरपालिका औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने फ़िल्टर केलेले जंतुरहित पाणी पुरविण्याचा प्रकल्प तयार करण्यांत आला.

सदरील प्रस्ताव २०.१०.२००३ रोजी मा.सर्वसाधारण सभेत ठेवण्यांत आला यावर चर्चा होऊन तूर्त हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत आले होते. २०.२.२००३ च्या मा.सर्व साधारण सभेत यावर चर्चा होऊन सविस्तर प्रस्ताव पुढील मा.सर्व साधारण सभेत ठेवण्यास मान्यता दिली होती.

त्यानुसार सविस्तर प्रस्ताव सादर करण्यांत येते की, रोटरी क्लब औरंगाबाद यांनी समता दर्शन प्राथमिक शाळा अदालत रोड व धर्मवीर संभाजी हायस्कूल सिडको एन -५ या ठिकाणी नमूना प्रकल्प म्हणून राबविण्यात आलेला आहे. या प्रकल्पाची पाहणी केली असून ते अत्यंत उपयुक्त वाटले.

सदरील प्रकल्पासाठी लागणारा खर्च खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे. प्रकल्प खर्च (प्रत्येक शाळेसाठी अंदाजीत खर्च)

| | | |
|---|---|---|
| १. | अंडरग्राऊंड स्टोअरेज टँक | रू.६०००/- |
| २. | नळ व स्टाईल्स | रू.४०००/- |
| ३. | ओव्हर हेड टॉक | रू.८०००/- |
| ४. | पंप विजेचे कनेक्शन | रू.५५००/- |
| ५. | वॉटर फ़िल्टर | रू.५०००/- |
| ६. | इतर खर्च | रू.१५००/- |
| | एकूण | ३०,०००/- |

सदरील प्रकल्प मनपाच्या ६६ शाळांमध्ये राबविण्यासाठी एकूण खर्च

| | |
|---|---|
| ६६ x ३०,०००/- | १९,८०,०००/- |
| रोटरी क्लबचा वाटा ५०% | ०९,९०,०००/- |
| मनपा औरंगाबाद यांचा वाटा ५०% | ०९,९०,०००/- |

मनपा हिश्यातील रक्कम दोन वर्षात अदा करावयाची आहे. सन २००४-०५ यावर्षी ४,९५,०००/- व २००५-०६ या वर्षी ४,९५,०००/- रू.

सदरील प्रकल्प उपयुक्त असून शाळेत जरी पाण्याची सोय असली तरी पाणी साठविणे व शुध्द ठेवणे तसेच पाण्याचा पुरवठा अनियमित होत असल्यामुळे शाळेला पाण्याची सोय योग्य प्रकारे होत नाही व प्रकल्पामुळे शाळांना दररोज शुध्द व चांगले पाणी मिळू शकते. म्हणून सदरील प्रकल्प मंजुर करणेसाठी प्रस्ताव सादर.

मा.महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेतील शाळांना पेयजल प्रकल्पाद्वारे ६६ शाळांना रोटरी क्लब औरंगाबाद व महानगरपालिका संयुक्त विद्यमाने ५०% प्रत्येकी खर्चाचा वाटा येणे प्रमाणे फिल्टर केलेले जंतुरहित पाणी पुरवठा करणेसाठी राबविण्यांत येणारे प्रकल्पाचा ५०% रक्कम दोन टप्प्यात रू.९,९०,०००/- म्हणजेच रू. ४,९५,०००/- सन २००४-२००५ वर्षी व उर्वरित रू.४,९५,०००/- सन २००५-२००६ वर्षात अदा करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. ३१७/१ :**

नगर सचिव यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शासन निर्णय,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्र.जिग्राप-१००३/७८८/प्र.क्र.८८७/ग्रा.सं.२ दिनांक २२ ऑक्टोबर २००३ अन्वये जिल्हा स्तरावर स्थापन करावयाच्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर नियुक्त करावयाचे अशासकीय सदस्यांपैकी नगरपालिकांचे दोन नगरसेवक नियुक्त करावयाचे आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी

औरंगाबाद यांचे पत्र क्र.२००४/पुरवठा/जिग्राप/कावि-१२२२ दिनांक १५.५.२००४ अन्वये महानगरपालिका सदस्यांमधून दोन पालिका सदस्यांची नांवे/पत्ता जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडे जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेसाठी पाठविणे बाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

श्री.भागवत कराड : मा.महापौरांनी दोन सदस्यांची नांवे द्यावीत प्रस्ताव मंजूर करावा.

मा.महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णय नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्र.जिग्राप -१००३/७८८/प्र.क्र.८८७ ग्रा.सं.-२/ दिनांक २२ ऑक्टोबर २००३ अन्वये जिल्हा स्तरावर स्थापन करावयाच्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर नियुक्त करावयाच्या दोन नगरसेवकांची नांवे निश्चित करून जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविण्याबाबतचे सर्व अधिकार मा.महापौर यांना देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१८/२ :**

१. प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छावणी हद्दीलगत असलेल्या सर्व्हे नं. २४,२५,२६ व २७ मधील अभिनंदन कॉलनी, न्यु नंदनवन कॉलनी, भुजबळनगर इत्यादी वसाहतीस जाणाऱ्या २८२ मीटर लांबीच्या पोच रस्त्यासाठी जागा संपादन करून लष्कर खात्यास रक्कम रू.१४,७९,९३३/- मोबदला किंवा तेवढ्या रकमेच्या मुल्यांचे कोणतेही एक मनपाने लष्कर खात्यास काम विकसीत करून देण्यासंबंधीचा ठराव क्र.२१३/६ दि.२९ जानेवारी २००१ अन्वये मा.सर्वसाधारण सभेने पारीत केलेला आहे.(प्रस्ताव व ठरावाचीप्रत सोबत जोडली आहे)

२. उपरोक्त ठराव पारीत झाल्यानंतर या विभागाकडून लष्कर खात्यास विकास करावयाच्या कामाची रूपरेषा / नकाशे देणेसाठी कळविण्यात आले होते. परंतू त्यांचेकडून त्या संदर्भात माहिती प्राप्त झालेली नसल्यामूळे ठरावाची अंमलबजावणी त्या वेखेस होवू शकली नाही. त्यानंतर लष्कर खात्याने महानगरपालिकेस वेळोवेळी विविध पत्र देवून असे कळविले की, महानगरपालिकेतर्फ़े ज्या जागेवर खडीकरण करण्यात आले आहे, त्या रस्त्यावरून लगतच्या वसाहतीतील नागरिक ये जा करीत आहेत, तो वहिवाटीचा रस्ता उपरोक्त रक्कम न भरल्यास बंद करण्यात येईल. तसेच लष्कर खात्याने त्यांचे पत्र क्र.५११५ / एन.एन.सी.आर/ ९ दि.०३.०४.२००२ या पत्राद्वारे असे कळविले की, पूर्वीच्या एस.टी.आर. नूसार सदरील रस्त्याच्या जमीनीचा मोबदला र.रू.१४,७९,३३३/- काढण्यात आला होता. आता नवीन एस.टी.आर नूसार सदरील रस्त्याच्या जमीनीचा मोबदला र.रू.१९,३३,८००/- ऐवढा होत असल्याचे, व ही रक्कम त्वरीत भरणेबाबत कळविले नसता रस्ता बंद करण्यात येईल असे देखील या पत्रात नमूद केले आहे. लष्कर खात्याच्या उपरोक्त पत्रांच्या अनुषंगाने अतिरिक्त शहर अभियंता व मा.आयुक्त महोदयांनी संबंधीत स्थानिक लष्कर अधिकाऱ्यांची भेट घेतली व या प्रकरणासंदर्भात सविस्तर चर्चा केली. तसेच लष्कर अधिकारी व सन्माननीय नगरसेवक श्री.सुनिल मगरे यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळावर रस्त्याची पाहणी करण्यात येवून प्रकरणी सविस्तर चर्चा झाली.

३. लष्कराच्या या पत्रात नमुद केल्यानूसार येथील वसाहतीकडे जाणारा पोच रस्ता बंद होवू नये म्हणून ठराव क्र.२१३/६ दि.२९.०२.२००१ च्या संदर्भासह दि.१९.०६.२००३ च्या

मा.सर्वसाधारण सभेत पून्हा सविस्तर प्रस्ताव विषय क्र.८८/६ अन्वये सादर करण्यांत आला असता, असा ठराव पारीत झाला की, ''लष्कराच्या जमीनीलगत मनपा हद्दीत अनाधिकृत वसाहती झालेल्या आहेत, शासनाने गुंठेवारी कायदा लागू केल्यामूळे लष्कराकडे भरणा करावी लागणारी रक्कम रू.१९,३३,८००/- प्रत्येक भुंखड धारकाकडून वसूल करून भरणा करण्यात यावी'' (प्रस्ताव व ठरावाची प्रत सोबत जोडली आहे.)

४. सन २००१ मध्ये जुन्या दराने जागेचे मुल्यांकन र.रू.१४,७९,३३३/- होते. नंतरच्या नवीन दराने त्याच जागेचे मुल्यांकन सन २००३ मध्ये र.रू.१९,३३,८००/- झाले आहे ही रक्कम रू.१९,३३,८००/- लष्कर खात्यास अदा न केल्यास येत्या नवीन एस.टी.आर नूसार दरवाढ होवून रक्कम वाढण्याची दाट शक्यता असल्याने, तसेच गुंठेवारी अंतर्गत नागरीकांकडून रक्कम जमा होणेसाठी आणखी काही काळ लागणार असल्यामूळे तुर्त ही रक्कम रू.१९,३३,८००/- मनपा फ़ंडातून लष्कर खात्यास अदा करावी. व गुंठेवारी अंतर्गत त्या भागातील नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या रकमेतून नंतर समायोजन करावे असे मत आहे.

५. सर्वसाधारण सभेत विषय क्र.२१३/६ अन्वये लष्कर खात्यास रक्कम रू.१४,७९,३३३/- अदा करणेस मंजूरी प्राप्त आहे. आता नवीन दराने (एस.टी.आर ने ) रक्कम रू.१९,३३,८००/- होत असल्यामूळे रक्कम रू. १९,३३,८००- रू.१४,७९,३३३ = रू.४,५४,४६७ /- या वाढीव रक्कमेच्या मंजूरीसह एकूण रक्कम रू.१९,३३,८००/- विचारविनिमय करून लष्कर खात्यास अदाईगी करणेच्या निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे छावणी हद्दीलगत असलेल्या स.नं.२४ ते २७ मधील अभिनंदन कॉलनी व इतर वसाहतीस जाणाऱ्या २८२ मीटर लांबीच्या पोच रस्त्यासाठी जागा संपादन करून लष्कर खात्यास आता नविन दराने (एस.टी.आर.) ने रक्कम रू.१९,३३,८००/- होते. पूर्वी जमिनीच्या मोबदल्याची रक्कम (जुन्या दराने) रू.१४,७९,३३३/- इतक्या रक्कमेस मान्यता दिलेली होती. आता वाढीव रकमेसह रू.१९,३३,८००/- इतकी रक्कम महानगरपालिका फ़ंडातुन काढून लष्कर खात्यास अदा करण्यास व गुंठेवारी अंतर्गत त्या भागातील नागरीकांकडून प्राप्त होणाऱ्या रकमेतून नंतर समायोजन करण्यास प्रस्तावात नमुद केलेल्या सर्व बाबीस अधिन राहून सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

यावेळी सभागृहात एकाचवेळी अनेक सदस्य बोलतात.

मा.महापौर : ऐनवेळचे सर्व प्रस्ताव मंजूर.

**विषय क्र. ३१९/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मयत महादु धोंडीबा बनकर यांनी एका महिलेचे प्राण वाचविण्यासाठी स्वत:चे प्राण गमवावे लागले. घरात एकटाच कमवता असल्याने त्यांच्या वारसांना महानगरपालिकेत कायम स्वरूपी नोकरीत सामावून घेण्यासाठी प्रस्तावास मंजूरी देण्यांत यावी.

सुचक : १. श्री.भगवान रगडे, २. श्री.जयवंत ओक, ३. सौ.साधना गणेश सुरडकर

अनुमोदक :१. श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली,२. सौ.शंकुतला इंगळे,३.सौ.कुसूमताई खरात

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मयत महादु धोंडीबा बनकर यांनी एका महिलेचे प्राण वाचविण्यासाठी स्वत:चे प्राण गमवावे लागले. घरात एकटाच कमवता असल्याने त्यांच्या वारसांना महानगरपालिकेत कायम स्वरूपी नौकरीत सामावून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२०/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक -१४, जयभवानीनगर येथील चौकात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्या ऐवजी अश्वारूढ पुर्णाकृती पुतळा चौकांच्या सौंदर्यीकरणासह उभारणे बाबतचा प्रस्ताव स्वीकृतीसह मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.काशिनाथ कोकाटे

अनुमोदक : डॉ.भागवत कराड, श्री.साहेबराव कावडे, श्रीमती जयश्री किवळेकर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक -१४, जयभवानीनगर येथील चौकात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्या ऐवजी चौकांच्या सौंदर्यीकरणासह अश्वारूढ पुर्णाकृती पुतळा उभारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२१/५ :**

प्रभाग क्रमांक १४ जयभवानीनगर येथील शिवाजी पुतळा ते मुंकूदवाडी रेल्वेस्टेशन रस्त्याचे डांबरीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. या कामासाठी अर्थसंकल्पात तरतूदही ठेवण्यांत आलेली आहे. तरी कृपया सदरील प्रस्ताव स्विकृतीसह मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.राधाकृष्ण गायकवाड अनुमोदक : श्री.काशिनाथ कोकाटे, सौ.जयश्री मोरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक १४ जयभवानीनगर येथील शिवाजी पुतळा ते मुंकूदवाडी रेल्वेस्टेशन रस्त्याचे डांबरीकरण अर्थसंकल्पात ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२२/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.३४ मध्ये कोटला कॉलनी येथे मा.आ.श्री.शालीग्राम बसैय्ये यांच्या निधीतुन एक हॉल बांधण्यात आलेला आहे. त्याठिकाणी महानगरपालिकेतर्फे वाचनालय/ग्रंथालय/अभ्यासिका चालू करण्यांत यावी. करीता सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर. तसेच प्रभाग क्र.२१ मध्ये पणे भारत माता मंदीर मध्ये वाचनालय चालू करावे.

सुचक : सौ.साधना सुरडकर अनुमोदक : डॉ.भागवत कराड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३४ मध्ये कोटला कॉलनी येथे मा.आ.श्री.शालीग्राम बसैय्ये यांच्या निधीतुन एक हॉल बांधण्यात आलेला आहे. त्याठिकाणी

महानगरपालिकेतर्फे वाचनालय/ग्रंथालय/अभ्यासिका चालू करण्यांस तसेच प्रभाग क्र.२१ मध्येपण भारत माता मंदीर मध्ये वाचनालय चालू करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच ‘‘ जन गण मन ‘‘ या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद